॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२२–२३/३४८ दिनांक : ०१/०२/२०२३

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** भारताच्या G-20 अध्यक्षते दरम्यान "Stay Safe Online" मोहीम राबविणे बाबत.
संदर्भ: प्रो रजनिश जैन, सचिव, विश्वविद्यालय अनुदाना आयोग नई दिल्ली यांचे जा.क्र. D.O.No.1-42/2022(e.Gov) Dated 03rd January 2023 चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये प्रो. रजनिश जैन, सचिव, विश्वविद्यालय अनुदाना आयोग, नई दिल्ली यांनी भारताने ०१ डिसेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२३ या एक वर्षासाठी अध्यक्षपद स्विकारले आहे. इलेक्ट्रॅनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (MeitY) हे डिजिटल इकॉनॉमी वर्किंग ग्रुपचे नोडल मंत्रालय आहे. G-20 च्या भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात MeitY "Stay Safe Online" नावाची सायबर जागरूकता मोहीम राबवेल सदरील मोहीमेचा उद्देश सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा सुरक्षित वापर, डिजिटल पेमेंट आणि इंटरनेटच्या संपुर्ण भारतातील माहितीच्या वापराबाबत विविध वापरकर्ता गटांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. सोशल मिडिया, ई–कॉमर्स, ऑनलाइन पेमेंट आणि इंटरनेटच्या इतर वापरांबद्दल हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये विद्यार्थी आणि तरूणांमध्ये जागरूकता निर्माण करणे, त्यांना सायबर फसवणूक आणि ऑनलाइन हानीपासून वाचवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. "Stay Safe Online" ही मोहीम या दिशेने एक प्रयत्न असल्या बाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात "Stay Safe Online" या मोहीमे अंतर्गत प्रश्नमंजुषा, गटचर्चा याद्वारे नियमितपणे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता कार्यक्रम राबविण्यात यावेत. तसेच डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२३ या कालवधीत निबंध लेखन स्पर्धा इ. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी MeitY प्रश्नमंजुषा, गटचर्चेसाठी विषय आणि निबंध लेखनासाठी प्रश्न बॅंक प्रदान करणार आहे.

या संदर्भात अधिक माहितीसाठी vinodk@gov.in आणि ask@meity.gov.in या ई–मेल वर संपर्क करण्यात यावा, ही विनंती.

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत कार्यवाहीस्तव:

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.